राजीव गांधी जीवनदायी आरोग्य
योजनेंतर्गत लाभार्थी कुटुंबाने आरोग्य
ओळखपत्र प्राप्त करुन घेण्याबाबतची
कार्यपध्दती व प्राधिकृत अधिकारी

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः रागांयो-२०१३/प्र.क्र. ५०१/आरोग्य-६
मंत्रालय, मुंबई
तारीख: १७ डिसेंबर, २०१३

**प्रस्तावना §**

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट लाभार्थी कुटुंबांना योजनेंतर्गत दिल्या गेलेल्या आरोग्य ओळखपत्राद्वारे सदर योजनेमध्ये समाविष्ट रुग्णालयांमधून नि:शुल्क उपचार अनुज्ञेय आहेत. सदर आरोग्य ओळखपत्रे अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या ePDS डेटावरुन संग्राम केंद्र व ई-सेवा केंद्रामार्फत किंवा पोस्ट कार्यालयातून छापून वितरीत करण्यात येणार आहेत. सदर आरोग्य ओळखपत्रावर सदर कुटुंबातील सदस्यांची छायाचित्रे चिकटविण्यात येणार आहेत. त्यामुळे सदर आरोग्य ओळखपत्र हे, शासकीय अधिकाऱ्यांनी स्वाक्षरीत करणे आवश्यक आहे. सदर स्वाक्षरीचे अधिकार ग्रामीण भागातील व शहरी भागातील शासकीय अधिकाऱ्यांना प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय §

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचे ओळखपत्र संग्राम केंद्र किंवा ई-सेवा केंद्रांकडून प्राप्त करुन घेण्यासाठी पिवळे शिधापत्रिकाधारक (रेशनकार्ड), अंत्योदय अन्न योजनेचे शिधापत्रिकाधारक, अन्नपूर्णा शिधापत्रिकाधारक व केशरी रंगाच्या शिधापत्रिकाधारकांनी खाली नमूद केलेल्या टप्प्यानुसार आरोग्य ओळखपत्र प्राप्त करुन घ्यावे.

१) वरील लाभार्थी कुटुंबाने स्वत:ची शिधापत्रिका (रेशनकार्ड) व कुटुंबातील सदस्यांची छायाचित्रे (फोटो) घेऊन जवळच्या संग्राम केंद्र किंवा ई-सेवा केंद्रावर किंवा पोस्ट कार्यालयामध्ये जावे.

२) सदर संग्राम केंद्रे, ई-सेवा केंद्र किंवा पोस्ट कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्याने सदर शिधापत्रिकेवरुन e-PDS डेटामधून सदर लाभार्थी कुटुंबाच्या आरोग्य ओळखपत्राची प्रिंट आऊट काढावी.

३) सदर प्रिंट आऊटवर लाभार्थी कुटुंबातील सदस्यांची छायाचित्रे लाभार्थ्यांने चिकटवावीत.

४) सदर आरोग्य ओळखपत्रावर खालील परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांपैकी एकाने सदर छायाचित्रे स्वाक्षांकित करावीत.

५) सदर आरोग्य ओळखपत्र स्वाक्षांकित केल्यानंतर ते लाभार्थ्यास देण्यात येईल.

योजनेंतर्गत पात्र लाभार्थी कुटुंबांना वितरीत करण्यात येणाऱ्या आरोग्य ओळखपत्रावर सदर कुटंबातील सदस्यांची छायाचित्रे चिकटविल्यानंतर सदर आरोग्य ओळखपत्रावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात येत आहेत.

अ) ग्रामीण विभाग:- शासकीय वैद्यकिय अधिकारी / आरोग्य सहाय्यक / ग्रामसेवक / तलाठी / ग्राम विस्तार अधिकारी / मंडल निरीक्षक / मंडल अधिकारी, सहाय्यक पोस्ट मास्टर / पोस्ट मास्टर, अन्य कोणताही राजपत्रित अधिकारी

ब) शहरी विभाग:- शासकीय रुग्णालयातील प्रभारी रुग्णालय वैद्यकिय अधिकारी व इतर वैद्यकिय अधिकारी, शासकीय महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / प्राध्यापक / वैद्यकिय अधिकारी / सहाय्यक अधिक्षक / अधिक्षक, पोस्ट कार्यालयातील सहाय्यक पोस्ट मास्टर / पोस्ट मास्टर, अन्द कोणताही राजपत्रित अधिकारी

सदर आरोग्य ओळखपत्रावरील छायाचित्र सबंधित कुटुंबातील सदस्याचे आहे याबाबतची आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, वाहनचालक परवाना, पॅन कार्ड किंवा तत्सम ओळखपत्राद्वारे खात्री करुन आरोग्य ओळखपत्रावर संबंधित अधिकाऱ्याने स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. तरीसुध्दा लाभार्थी कुटुंबांना आरोग्य ओळखपत्र विनासायास वितरीत होईल याबाबतची दक्षता उपरोक्त नमूद अधिकाऱ्यांनी घेणे आवश्यक आहे. ओळखपत्रावरील अधिकाऱ्यांची स्वाक्षरी ही केवळ छायाचित्र

सदर व्यक्तीचे असल्याच्या पुष्ट्यर्थ असेल. ओळखपत्रातील अन्य माहितीची जबाबदारी अन्न व नागरी पुरवठा विभागाची असेल.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ही लाभार्थी कुटुंबांना गुणवत्तापूर्ण वैद्यकिय उपचार, निशु:ल्क आणि विनासायास मिळण्यासाठी शासनाची महत्वाकांक्षी योजना आहे. त्यामुळे सदर आरोग्य ओळखपत्रावर तात्काळ स्वाक्षरी करुन आरोग्य ओळखपत्र वितरीत करणे आवश्यक आहे. आरोग्य ओळखपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी सर्व लाभार्थी कुटुंबांना याबाबतची कार्यपध्दती माहिती होण्यासाठी सदर शासन निर्णयाच्या प्रती सर्व ग्राम पंचायती, पोस्ट कार्यालये, नगरपालिका, महानगरपालिका, तहसिलदार व जिल्हाधिकारी कार्यालय इ. ठिकाणी दर्शनी भागामध्ये लावण्याच्या सूचना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संबंधितांना निर्गमित कराव्यात.

सदर शासन निर्णय ग्राम विकास व पंचायत राज विभाग, महसूल व वन विभाग आणि वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक <संकेताक क्रमांक लिहा> असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अ. सं. फडतरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

६. अपर मुख्य सचिव, (सेवा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, मुंबई,
१५. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
१६. संचालक, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
१७. मुख्य पोस्ट मास्टर जनरल, मुंबई
१८. सर्व जिल्हाधिकारी
१९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२०. सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा
२१. सर्व जिल्हा शल्यचिकित्सक
२२. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी
२३. महा ऑनलाईन, मंत्रालय, मुंबई
२४. निवड नस्ती